# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६.
ई-मेल: mercindia@mercindia.org.in वेब-साईट www.mercindia.org.in

**आयोगाने स्वत: सुरु केलेल्या सन २०१२ च्या प्रकरण क्र.५० मधील कामकाज**

**दिनांक: १८ मे, २०१२**

## मुक्त प्रवेशासंबंधीचे प्रश्न

## जाहीर सूचना

विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ च्या कलम १७ खाली महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची (आयोग) महाराष्ट्र राज्याकरिता आयोग म्हणून स्थापना करण्यात आली. विद्युत अधिनियम २००३ (२००३ चा अधिनियम)च्या प्रयोजनार्थ सदर अधिनियमाच्या कलम ८२ च्या पहिल्या परंतुकाखाली सदर आयोग राज्य आयोग म्हणुन पुढे चालू ठेवण्यात आला. २००३च्या अधिनियमांतर्गत आयोगाकडून विविध प्रकारची कार्ये पार पाडण्यात येतात. यापैकी एक कार्य, कलम ४२ खाली विजेच्या वितरणात मुक्त प्रवेश सुरु करणे आणि मुक्त प्रवेश ग्राहकांकरिता त्यासाठी वहन आकार आणि त्यावर अधिभार निश्चित करण्यासह या संबंधातील अन्य सर्व तरतुदी विचारात घेणे, हे आहे.

भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने त्यांच्या दिनांक ३० नोव्हेंबर, २०११ च्या पत्राद्वारे अशी विनंती केली आहे की, भारत सरकारच्या विधी व न्याय विभागाने व्यक्त केलेले मत विचारात घेऊन २००३ च्या अधिनियमांतर्गत मुक्त प्रवेशासंबंधीच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात. विधी व न्याय विभागाने खालीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे :-

(अ) २००३ च्या अधिनियमातील तरतुदींनुसार घाऊक ग्राहक (१ मेगावॅटपेक्षा जास्त विजेचा वापर असणारे) हे कलम ४२ (२) च्या आधारे, जानेवारी २००९ पासून मुक्त ग्राहक म्हणून मानण्यात येतील.

(ब) अशा मुक्त प्रवेश ग्राहकाने द्यावयाचे ऊर्जा आकार राज्य आयोग यापुढे ठरविणार नाही; परंतु २००३ च्या अधिनियमातील तरतुदींनुसार वहन आकार आणि अधिभार आयोगाने निश्चित करणे पुढेही चालू राहील.

(क) २००३ च्या अधिनियमातील विविध तरतुदींच्या (विशेषत: कलम ४९) विश्लेषणावरुन असे दिसून येते की काही ग्राहकांना जर स्पर्धा करणाऱ्या स्त्रोतांकडून वीज पुरवठा घेण्याच्या पर्यायाचा लाभ घ्यावयाचा असेल तर परिणामस्वरुप वितरण कंपन्या/वितरण परवानाधारकांवर अशा ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्याची सक्ती असण्याचे बंधन नसावे. अशा ग्राहकांना जर वितरण कंपनीकडून वीज पुरवठा हवा असेल तर कलम ४९ च्या आधारे वीज पुरवठ्याच्या अटी व शर्ती निश्चित करण्यात येतील.

(ड) मुक्त प्रवेशाची अंमलबजावणी करण्यासाठी कलम ४२ (३) अंतर्गत नोटीस देणे, ही पूर्व-अट नाही. त्यामुळे अशी नोटीस ही वितरण परवानाधारकाच्या विद्युत जाळ्याचा वापर करण्यासाठी परवानगी मागण्यासाठी नाही. सदर नोटीस केवळ मुक्त प्रवेश ग्राहकांचा अशा जाळ्याचा वापर करण्याचा उद्देश असल्याचे कळविण्यासाठी आहे.

अधिनियमानुसार पारेषण आणि वितरण जाळ्यात मुक्त प्रवेश देणे अभिप्रेत आहेत. अगदी प्रारंभापासून आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय पारेषणातील मुक्त प्रवेशाला परवानगी देण्यात आली आहे. तथापि, वितरणातील मुक्त प्रवेशाच्या संबंधात ग्राहक वर्गवारीमधील कामकाजातील मर्यादा आणि क्रॉस सबसिडीचे अस्तित्व यथोचितपणे विचारात घेऊन मुक्त प्रवेश टप्प्याटप्प्यने सुरु करणे अधिनियमाखाली अभिप्रेत आहे. त्याच वेळी, आयोगाने ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्याची आणि ते सुरक्षित ठेवण्याची गरज आहे. वीज वितरणामध्ये टप्प्याटप्प्याने मुक्त प्रवेशाची सुरुवात करण्याची जबाबदारी राज्य विद्युत नियामक आयोगांवर सोपविण्यात आली आहे.

त्यामुळे, विधी आणि न्याय विभागाने व्यक्त केलेल्या मतांमधील चार ठळक निर्ष्कषांवर आणि अन्य संबंधित बाबींबाबत महाराष्ट्र राज्यातील जनता आणि सर्व हितसंबंधितांकडून त्यांची मते आणि सूचना स्वत:हून मागविण्याचे आयोगाने ठरविले आहे. या प्रश्नावर चर्चा घडवून आणण्याचा आणि हितसंबधितांकडून अभिप्राय मागविण्याचा या जाहीर नोटीशीचा उद्देश आहे. अशी मते व सूचना ३० जून २०१२ पर्यत खालील पत्त्यावर कृपया पाठविण्यात याव्यात:

सचिव,<br>
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,<br>
१३ वा मजला, सेंटर क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर,<br>
कफ परेड, मुंबई - ४०० ००५.<br>
(ईमेल : secretary@mercindia.org.in)

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली मते आणि सूचना विचारात घेण्यासाठी आयोगाकडून सुनावणी आयोजित केली जाण्याची शक्यता आहे. अशा सुनावणीचे ठिकाण, दिनांक आणि वेळ आयोग वेगळ्या सूचनेद्वारे जाहीर करील.

मुक्त प्रवेशावरील भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाच्या दि. ३० नोव्हेंबर, २०११ रोजीच्या संदर्भ क्र. २३/१/२००८-आर ॲण्ड आर (खंड-चार) असलेल्या पत्राची प्रत, नियामकांच्या मंचाच्या (एफ ओ आर) मुक्त प्रवेशाबाबत सद्यस्थितीदर्शक टिपणी (पोझिशन पेपर)सह (मे २०१२) आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत-स्थळावर उपलब्ध आहे.

सचिव